स्थापना दि. १७ ऑगस्ट १९८४

# लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर

मुख्य कार्यालय, टिळक नगर, मेन रोड, लातूर.

फोन नं.(पी.बी.एक्स) (०२३८२) २४५१३०, २४३१३१, २४३१४३, २५६९१९. कार्यकारी संचालक ०२३८२-२४३६४७

फॅक्स ०२३८२-२४२१८३. ई-मेल admin@laturdccb.com

International Year of Cooperatives 2025

Cooperatives Build a Better World

जा.क्र. सामान्य प्रशासन / नोकर भरती / /२०२६-२७ दिनांक : ----------------

प्रति,

श्री. / श्रीमती :-----------------------------------

अर्ज क्रमांक : -----------------------------------

बैठक क्रमांक :-----------------------------------

अर्ज केलेले पद : -----------------------------------

विषय : बँकेच्या सरळसेवा नोकरभरती प्रक्रियेत Sub Grade (Multipurpose Support Staff) व वाहन चालक या पदासाठी कागदपत्र पडताळणी आणि मुलाखती बाबत.

बँकेच्या सरळसेवा नोकरभरतीसाठी दिनांक १८.१२.२०२५ रोजीचे वृत्तपत्रातील जाहिराती नुसार तुम्ही जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या बेबसाईटवर Sub Grade (Multipurpose Support Staff) व वाहन चालक पदासाठी नोकरी मिळणेबाबत ऑनलाईन अर्ज केलेला आहे. या पदाच्या भरतीसाठी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे कागदपत्र पडताळणीसाठी तुम्ही पात्र आहात.

कागदपत्र पडताळणीसाठी व मुलाखतीसाठी तुम्ही खालील वेळेत व नमुद ठिकाणी उपस्थित राहावे.

| कागदपत्र/ प्रमाणपत्र तपासणीचे ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| दि. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, टिळक नगर, मेन रोड, लातूर ४१३५१२. व बँक शाखा गुळमार्केट, सोनवणे स्टॅच्यु जवळ, लातूर. | दि. २८.०६.२०२६ व दि. २९.०६.२०२६ या कालावधीत होणार आहे. बँकेमार्फत पात्र उमेदवारांची दि. २८.०६.२०२६ ते दि.२९.०६.२०२६ या कालावधीतील Participent ID सह पाठविलेली आहे. | सकाळी ९.०० वाजता |

उपरोक्त वेळेनंतर तुम्ही हजर झाल्यास, तुमची कागदपत्रे तपासली जाणार नाहीत.

कागदपत्र पडताळणी व मुलाखती संदर्भात उमेदवारांकरिता महत्वाच्या सुचना

१) उमेदवाराने कागदपत्र पडताळणी व मुलाखतीसाठी येताना ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

२) उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी व मुलाखतीकरिता येतांना सदर पत्र सोबत आणावयाचे आहे.

३) उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीच्या आधारे त्यास लेखी परिक्षेत बसण्याची संधी देण्यात आलेली होती. जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती उमेदवाराने अर्जता नमुद केलेल्या माहितीची पुर्तता करणारी मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. या तपासणीच्या वेळी उमेदवार अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास, त्याच्या उमेदवारीचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

४) मुलाखतीस येतांना उमेदवाराने त्याचे मुळ प्रमाणपत्र व त्याच्या प्रत्येकी दोन प्रती सोबत आणावीत. मुळ प्रमाणपत्र ऐवजी झेरॉक्स प्रती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाहीत व अशा परिस्थितीत संबंधित मुळ कागदपत्रे हजर केली नाहीत. असे समजन्यात येईल व अशा उमेदवारांना मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल.

५) जन्मतारीख / वयाच्या पुराव्यासाठी उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणतेही पुरावे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६) प्रमाणपत्र / गुणपत्रक ऐवजी इतर कोणतेही पत्र ज्ञापन अन्य पुरावा स्वीकारला जाणार नाही. (तसेच उमेदवाराने एस.एस.सी., एच.एस.सी. व इतर शैक्षणिक अर्हतेचे गुणपत्रक प्रमाणपत्र सोबत घेऊन यावीत) कोणतेही आवश्यक मुळ प्रमाणपत्र उमेदवार सादर करू शकत नसेल तर त्याकरिता उमेदवारास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात नमुद केलेली माहिती व मुळ कागदपत्र / प्रमाणपत्र यात तफावत / त्रुटी किंवा माहिती खोटी आढळल्यास भरती प्रक्रियेत उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७) सर्व कागदपत्र उमेदवारांच्या स्वतःच्या नावाने असणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहानंतर नावात बदल केला असल्यास, नावातील बदलाचा पुरावा दर्शक शासन राजपत्राची मुळ प्रत किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

८) जाहिरातीत नमुद बँकेतील कामकाजाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या सही शिक्यांनीशी अनुभवाचा दाखला कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

९) Domicile (अधिवास / रहिवास) प्रमाणपत्र.

१०) उमेदवारांची मुलाखत १० गुणांची घेण्यात येईल.

११) शैक्षणीक कागदपत्रांच्या व्यतिरिक्त उमेदवाराने आधारकार्ड व पॅनकार्डची मुळ व २ छायांकीत प्रती व २ पासपोर्ट साईज कलर फोटो सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

१२) कागदपत्र पडताळणी / मुलाखतीकरीता उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता अशा उमेदवारांचा विचार करण्यात येणार नाही.

१३) वाहन चालक पदाकरीता ड्रायव्हींग लायसेंस मुळ प्रत व दोन झेरॉक्स प्रती प्रमाणीत करून घेवुन येणे आवश्यक.

१४) वाहन चालक पदाकरीता ड्रायव्हींग स्किल टेस्ट घेणेत येईल.

१५) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी व मुलाखतीसाठीचे हे पत्र म्हणजे त्यांची अंतिम निवड नसुन, उमेदवारांना अंतिम निवडीसंबंधी कोणताही दावा किंवा हक्क करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१६) कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस येतांना उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास व अन्य खर्च दिला जाणार नाही.

कार्यकारी संचालक

दि. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर

लातूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. मुख्य कार्यालय, लातूर

D/Shirish/ new recruitment Marathi letters